# लोकनेते मा. आमदार श्री. मोहनराव कदम तथा दादा षष्ठ्यब्दीपूर्ती : एका काँग्रेस समर्पित जीवनाची

## ।। सन्मानपत्र ।।

आदरणीय दादा,

महाराष्ट्राची ही भूमी, लोककल्याणासाठी, जिथे कर्तृत्ववान भावंडांना जन्म देती झाली, अशा एका कुटुंबाचे कुटुंबप्रमुख आणि विधान परिषद आमदार म्हणून उभ्या पश्चिम महाराष्ट्राचे पालक असलेल्या आपणास, आपल्या ६० वर्षांच्या प्रदीर्घ व अविरत पक्षसेवेच्या गौरवार्थ, हे मानपत्र अर्पण करीत असताना, ही सभा एका अलौकिक धन्यतेचा अनुभव घेत आहे.

दादा, देशभक्तीच्या भावनेने भारावलेल्या गांधी-नेहरु युगात, १९४० च्या दशकात, आई बयाबाई आणि वडील श्रीपतराव यांच्या पोटी आपला जन्म झाला. सात भाऊ आणि एक बहीण यांच्यातील आपण सर्वांत थोरले. आजवरच्या ८१ वर्षांच्या आयुष्यात भाग्यानं लाभलेलं 'हे थोरलेपणं' आपण मोठ्या गांभिर्याने सांभाळलेत आणि याच 'थोरलेपणाची शाल' आयुष्यात आलेल्या प्रत्येकावर मोठ्या आपुलकीने पांघरलीत. सामान्य माणसाच्या मनात आपल्याबद्दल अपार आदराची भावना निर्माण करणारं आपलं औदार्य, आपल्याला 'शेठ' या उपाधीने सन्मानित करुन गेलं.

महाराष्ट्र राज्यातील काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, भारती विद्यापीठाचे संस्थापक कुलपती डॉ.पतंगराव कदमसाहेब यांच्या लोकविलक्षण कार्याचे या भूमीतील भूमीपुत्रांच्या उद्धाराचे आपण अधिष्ठान झालात. आदरणीय डॉ.पतंगराव कदमसाहेब आदि भावंडांनी महाराष्ट्रात आणि देशात जे काम उभं केलं, त्याला मूर्त रुप देताना आपण या मातीशी असणारा बंध अधिक बळकट केलात.

आजच्या काळात माणूस माणसापासून दूर चालला आहे. 'मी आणि माझे' एवढीच भावना बळावते आहे. अशावेळी 'एखाद्या कुटुंबाची एकी' ही लोकल्याणाच्या वाटेवर किती प्रभावी आणि व्यापक योगदान देऊ शकते, याचे उदाहरण देताना, महाराष्ट्राचा भविष्यकाळ हा 'बारामतीचे पवार आणि सोनसळच्या कदम कुटुंबियांचे' नांव घेईल, यात तीळमात्र शंका नाही.

दादा, कदम कुटुंबियांच्या दारी आलेला माणूस कधीच विन्मुख गेला नाही, हा इथल्या प्रत्येकाचा अनुभव आहे आणि कदम कुटुंबियांच्या भावी पिढ्यांच्यावर आपण केलेला हा एक संस्कार आहे. या कुटुंबाने या भूमीच्या भूमीपुत्रांवर जे प्रेम केले तेच प्रेम,

आपण आयुष्यात आलेल्या प्रत्येकाला दिलेत. पुनर्वसनामुळे हताश झालेल्या वाजेगाव ग्रामस्थांच्या सुखदु:खाशी एकरुप होत, त्यांच्यासोबत उर्वरीत आयुष्य घालविण्यासाठी आपण वाजेगाववासी झालात. आपण कृतीने जे उदाहरण घालून दिलेत, असा संवेदनेचा संस्कार दाखविणारे उदाहरण इतिहासाला क्वचित माहित असेल. एका बाजूला धरणाच्या पाण्याखाली गेलेले उभे गाव नव्याने वसविणारे आपण एक भाग्यवंत भगीरथ झालात.

खानापूर आटपाडी पंचायत समितीचे सभापती म्हणून, सांगली जिल्ह्याच्या जिल्हा परिषदेचे अध्यक्ष, जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष अशा कितीतरी पदांवर काम करीत असताना आपण भेद आणि विद्धेशाच्या भावनेपलीकडे जात, या जिल्ह्याच्या विकासाला स्व.यशवंतराव चव्हाणसाहेब, स्व.वसंतरावदादा पाटील, क्रांतीसिंह नाना पाटील, क्रांती अग्रणी जी.डी.बापू, स्व.राजारामबापू पाटील यांच्याकडून प्राप्त झालेल्या वारश्याला, एक ऐतिहासिक चालना आणि चैतन्य प्रदान केलेत. जिल्ह्यातील कोणत्याही मुख्य मार्गाच्या दुतर्फा, 'कुठंपासून कुठंपर्यंत, कोणती झाडं लावली आहेत', हे सांगणारे या देशातील कदाचित आपण एकमेव जिल्हा परिषदेचे अध्यक्ष होता. डॉ.पतंगराव कदमसाहेब यांच्या द्रष्टेपणातून साकारलेले आणि या जिल्ह्याला राष्ट्रीय नकाशावर स्थान मिळवून देणारे, 'सागरेश्‍वर अभयारण्य', 'वाणिकी' यासारखे प्रकल्प, 'आपल्याला लाभलेला 'वनश्री' हा पुरस्कार, हे सर्व, मातीशी असणाऱ्या नात्यात, आपण आपल्या आयुष्याची धन्यता शोधता, हेच दर्शविता.

दादा, साहेबांच्या विजूगिषी वृत्तीला अधोरेखित करणारे, त्यांच्या द्रष्टेपणातून साकारलेले आणि आपल्या मार्गदर्शनाखाली अल्पावधीत ऐतिहासिक यश प्राप्त करणारे 'सोनहिरा साखर कारखान्या' सारखे प्रकल्प, आज सहकार क्षेत्राचे राष्ट्रीय मापदंड झाले आहेत. सोनहिरा सहकारी दूध संघ, सागरेश्‍वर सूतगिरणी, कृष्णा-येरळा मागासवर्गीय सूतगिरणी या आणि अशा कितीतरी उद्योगांच्या उभारणीत आपण बहुमोल योगदान दिलेत. आपल्या याच योगदानाची कृतज्ञतेने नोंद घेत, चिंचणी-वांगी-तडसर आणि अंबकच्या सीमारेषेवरील माळाचे, लोकांनी मोहनराव कदमनगर असे नामकरण केले. पृथ्वीच्या निर्मितीपासून ज्या माळरानावर केवळ कुसळेच उगवली, तो आपले नांव धारण केलेला माळ आज संपदेच्या दीव्यांनी उजळून निघाला आहे. मातीशी असणाऱ्या या नात्याचा आदर करत, भारती विद्यापीठाने आपल्या कृषी महाविद्यालयाला आपले नाव देत आपल्या कृषीसेवेचा सन्मान केला आहे.

'एक अजातशत्रू व्यक्तिमत्व' म्हणून सांगली जिल्ह्याच्या राजकारणात आपले एक विशेष स्थान आहे. भल्या पहाटे सुरु होणाऱ्या, आयुष्यातील प्रत्येक दिवशी, काही संकल्प करीत, लोकांच्या सुखदु:खाशी एकरुप होत, संकटाशी झुंजणाऱ्या माताभगिनींच्या

डोळ्यातील अश्रू पुसत, कार्यकर्त्यांना बळ देत, तरुण हातांना रोजगार आणि उद्योगासाठी प्रेरीत करीत वयाच्या ८२ व्या वर्षीही आपण आजही पुढे चालला आहात. आप-पर भाव विरहित जीवन जगला आहात. यामुळेच पश्चिम महाराष्ट्राने आपणास नेतृत्वासाठी गळ घातली आणि मातीशी नातं सांगणारे आपण विधान परिषदेचे आमदार झालात.

देशाला स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्या कॉंग्रेस पक्षाने इतिहासात अनेक चढ उतार पाहिले. कॉंग्रेस पक्षाच्या या ऐतिहासिक वाटचालीचे आपण एक प्रत्यक्षदर्शी आहात. पक्षासाठी अत्यंत बिकट काळातही, आपण कॉंग्रेस पक्षाशी अविचल रहात, 'एकनिष्ठ' या शब्दाला अर्थ प्राप्त करुन देते झालात. आयुष्याच्या वाटेवर आपल्या या लोकसेवेच्या यज्ञात आपल्या संसारसुखाच्या होळीचा महायज्ञ चेतविणाऱ्या आपल्या पत्नी सौ. यशोदा यांच्याही प्रति ही सभा कृतज्ञता व्यक्त करते आहे.

मा. डॉ. पतंगराव कदमसाहेब आणि आपला हा लोककल्याणाचा वारसा, अधिक व्यापक आणि अधिक क्षमतेने चालविणारे मंत्री म्हणून, नामदार डॉ. विश्वजीत कदम यांचा उल्लेख करावा लागेल. आकाशाशी नातं सांगण्याची ताकद असली तरी महाराष्ट्राचा हा नेता, मातीत आपले पाय घट्ट रोवून उभा आहे, याचे श्रेय, दादा आपल्याच संस्कारांना द्यावे लागेल.

दादा, लोकमान्य टिळकांच्या या महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेसला, आज दिल्लीत जी किंमत आहे, त्याचे श्रेय आपल्यासारख्या कार्यकर्त्यांच्या निष्ठेला आणि त्यागाला द्यावे लागेल. देश आज स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करीत आहे. अशावेळी, स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर कालखंडाना जोडणारा एक समर्थ दुवा असणाऱ्या आपणास, पक्षसेवेच्या षष्ठ्यब्दीपूर्ती निमित्त, हे मानपत्र प्रदान करताना आम्हाला होणारा आनंद शब्दातीत आहे. आपण लोकसेवेसाठी दिलेल्या अनन्यसाधारण योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना आपले व्यक्तिमत्व प्रतिबिंबीत करणाऱ्या ना. धो. महानोर यांच्या ओळी ओठावर येतात,

या मातीने लळा लावला असा असा की, सुखदु:खाला परस्परांच्या हसलो-रडलो,
याने तर हा जीवच अवघा जखडला, मी त्याच्या हिरव्या बोलीचा शब्द जाहलो ।

आपले,

**महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटी**